# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १२.१०.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**पारडी पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०६.१०.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, फिर्यादी नंदु नामदेव डोंगरे वय ३२ वर्षे, रा. खापरी, कुरडकर वार्ड नं. २, तह. उमरेड, जि. नागपुर हे त्यांचे केपनीचे आयशर ट्रक क्र. सि.जी ०८ ए.जी १३५९ ने चालक नामे जॉनी अंकुश वाघाडे, वय ४० वर्षे, रा. उमरा, व लेबर नामे सागर फोकन मुंडल, वय २० वर्षे, रा. विहीरगांव यांचेसह बॉयलर कोंबडीचा माल गाडीमध्ये लोड करून जात असतांना, पोलीस ठाणे पारडी हद्दीत हैदराबाद कडे जाणारा रोड, महालक्ष्मी पेट्रोल पंप जवळील चहा टपरी येथे चहा पिण्याकरीता थांबले होते. बाजुलाच पायदळ लघुशंकेकरीता लेबर सागर याचेसह जात असतांना पाच अनोळखी ईसमांनी तेथे येवुन, फिर्यादी व लेबर यांना चाकुचा धाक दाखवुन जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच, हातबुक्कीने मारहाण करून, फिर्यादी व लेबर यांचेजवळील रोख ५००/—रू. व ०३ मोबाईल फोन असा एकुण ३५,५००/—रू. मुद्देमाल जबरीने हिसकावुन घेवुन, तेथुन पळुन गेले. फिर्यादी यांनी दिनांक ११.१०.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे अनोळखी आरोपींविरूध्द कलम ३१०(२), १२६२(२) भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे तपासात पारडी पोलीसांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपींना निष्पन्न केले व आरोपी नामे १) राहुल मोहन चौधरी, वय १९ वर्षे, रा. जुनी मंगळवारी, घासबाजार चौक, ह.मु.— स्वागत नगर, चर्चमागे, भांडेवाडी, नागपुर २) प्रियांशु उर्फ पांडा मंगलदास ठाकरे, वय २२ वर्षे, रा. आराधना नगर, भांडेवाडी, नागपुर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा त्यांचा एक पाहीजे आरोपी साथीदार तसेच, दोन विधीसंघर्षग्रस्त बालक यांचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना अटक करून, त्यांचे ताब्यातुन ०३ मोबाईल फोन किंमती ३५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. नित्यांनद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (पारडी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्रीमती नंदा मनगटे, पोउपनि. अरविंद कोल्हारे, मपोउपनि. राजकिरण डोके, पोहवा. संदीप लांडे, शैलेष कुंभलकर, नापोअं. निलेश यादव, निखील मोहीते, पोअं. धनराज उमरेडकर, योगेश बोरेकर व गौरव युवते यांनी केली.



(गुन्हे)

**पोलीस ठाणे पारडी :— घरफोडीचा गुन्हा दाखल.**

फिर्यादी अनिल एकनाथराव राऊत, वय ५२ वर्षे, रा. प्लॉट नं. २५५, विनकर कॉलोनी, मानेवाडा, नागपूर हे हेमंत ॲण्ड कंपनी, त्रिमुर्ती नगर, नागपुर येथे सुपरवायझर म्हणुन काम करतात. त्यांचे कंपनीचे पोलीस ठाणे पारडी हद्दीत, टाईप २ बिल्डींग चे बांधकाम साइटवर ईले. फिटींगची कामे सुरू आहे. बिल्डींगमधील पहील्या माळ्याचे एका रूममध्ये ईलेक्ट्रीक फिटींगचे सर्व साहीत्य ठेवलेले होते. दिनांक १०.१०.२०२६ चे १९. ३० वा. ते दिनांक १२.१०.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने रूमचे दोन कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, रूममध्ये ठेवलेले वेगवेगळ्या एम.एम.चे एकुण ३० बंडल ईलेक्ट्रीक वायर किंमती १,६१,७७६/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे मपोउपनि. राजकिरण डोके यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :—** दिनांक १२.१०.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, प्लॉट नं. २२२, मातोश्री नगर, वानाडोंगरी येथे राहणाऱ्या सौ. कविता गणेश पिंपळशेंडे, वय ३८ वर्षे, ह्या त्यांचे राहते घरी किचनरूममध्ये हिटर ने पाणी गरम करीत असतांना, त्यांना ईलेक्ट्रीक करंट लागल्याने त्या खाली पडुन बेशुध्द झाल्या. नातेवाईकांनी त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी धनराज फुलचंद पिंपळशेंडे, वय ४७ वर्षे, रा. बालाजी नगर, हिंगणा, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे सपोनि. गजानन काठेवाडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** दिनांक ११.१०.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, भालचंद्र निलेश सडमाके, वय ३० वर्षे, रा. चनकाई नगर, शिक्षक कॉलोनी, गडचिरोली हे त्यांचे मित्र राजीक यांचे दुचाकी डिओ मोपेड एम.एच ३३ के. ५५४५ वर मागे बसुन जात असता, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत हुडकेश्वर रोड, एचपी पेट्रोलपंप समोरील, अमृततुल्य चहा सेंटर समोर, रस्त्याचे गड्यामध्ये गाडीचे मागील चाक गेल्याने मागे बसलेले भालचंद्र हे गाडीचे खाली डोक्याचे भारावर पडल्याने, जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल ट्रॉमा सेंटर येथे दाखल करण्यात आले होते, उपचारादरम्यान दिनांक १२.१०.२०२६ चे ११.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. अमजद शेख ९९९१९९५१९१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

**१) पोलीस ठाणे कळमना :—** फिर्यादी श्रीमती राधा राजेंद्र निषाद, वय ३८ वर्षे, रा. वैष्णो देवी नगर, निर्मलकर यांचे घरी किरायाने, शिवशक्ती बारमागे, शितला माता मंदीर जवळ, कळमना, नागपूर यांनी पोलीस ठाणे कळमना येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. आंचल जितेंद्र निषाद, वय १७ वर्षे ही दिनांक ०३.१०. २०२६ रोजी पासुन राहते घरून बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात

आरोपीविरुध्द **कलम १४०(३) भान्यासं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—६ फुट १ इंच, केस—काळे लांब, अंगात— निळ्या रंगाचा सलवार सुट व कत्थ्या रंगाची लॅगीन तसेच, हिरव्या रंगाचा दुपट्टा घातलेले आहे. भाषा— मराठी, हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे कळमना :—** फिर्यादी शाहीद नसरूद्दीन शेख, वय ५५ वर्षे, रा. प्लॉट नं. २२०, चित्रशाळा नगर, कळमना, नागपूर यांनी पोलीस ठाणे कळमना येथे तक्रार दिली की, त्यांचे साळीची मुलगी नामे कु. अपसीन कौसर वल्द अब्दुल जमील, वय १६ वर्षे ही दिनांक २२.०९.२०२६ रोजी पासुन राहते घरून बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १३७(२) भान्यासं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—साधारण, उंची—४ फुट ९ इंच, केस—काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाचा नकाब, व काळे रंगाचा बुरखा घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** फिर्यादी शैलेश राजु कांबळे, वय २५ वर्षे, रा. प्लॉट क्र. ७७/अ, म्हाळगी नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर यांनी पोलीस ठाण हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची बहीण नामे कु. पुनम राजु कांबळे, वय २३ वर्षे, ही दिनांक ०५.१०.२०२६ चे १७.३० वा. पासुन राहते घरून बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द **कलम १४०(३) भान्यासं.** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे लांब, अंगात— नेव्ही ब्ल्यु रंगाचा सलवार व काळ्या रंगाचा लॅगीन घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलते.


कु. आंचल


कु. अपसीन


कु. पुनम

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ८, नागपुर. | २७९३/२०११ | कलम २९४ भा.दं.वि. | हरीओम बाबुलाल कौशल, रा. घटाटे ले—आऊट, व्हिआयपी रोड, भोले पेट्रोल पंप समोर, नागपुर. | १६.१०.२०२६ |
| २ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३८३५/२०१६ | कलम ४२० भा.दं.वि. | भोजराज सखाराम धाडवे, रा. केटीपिएस कॉलोनी, कोराडी, ह.मु.— प्लॉट नं. ४, साई किराणा जवळ, दहेकरचे घरी किरायाने, कोराडी, नागपुर. | १४.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **३** | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३०८०३९२/१९९४ | कलम ३८१, ४११ भा.दं.वि. | १) राजु गुलाबराव धोटे उर्फ सुधाकर पंजाबराव राऊत, रा. कळमेश्वर, तह. काटोल, जि. नागपुर.<br>२) श्रीराम गोविंदराम झाडे, रा. महालगांव, कामठी, जि. नागपुर<br>३) शुभुराज धोंडबाजी कडु, रा. वरोडी, तह. कामठी, जि.नागपुर | १४.१०.२०२६ |
| **४** | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ४५५/२०२६ | कलम १०९(१), ३५२, १४०(१), ३(५) भा.न्या.सं. | रजा उर्फ बाबुप्रसाद, रा. खापरी गांव, कोराडी, नागपुर. | २८.१०.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**